कृषी विज्ञान विद्याशाखा

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक – ४२२ १०१

फोन (०२५३) २२३१७१४,१५

दिनांक: 09/08/2021

प्रति.

मा.कृषी शिक्षण केंद्रप्रमुख/ संयोजक,

सर्व अंतिम कृषी पदवी वर्ष उत्तीर्ण विद्यार्थी

आणि सर्व सबंधीत

विषय : कृषी विज्ञान पदवी(B.Sc.- Agriculture) आणि उद्यानविद्या पदवी (B.Sc.-Horticulture)अंतिम प्रकल्प अहवाल : 2021, विद्यापीठ पोर्टलवर देण्यात आलेल्या या लिंकवर जमा /अपलोड करण्यासंबंधीच्या महत्त्वाच्या सूचना

महोदय,

सर्वप्रथम जून –जुलै 2021 या कालावधीत कृषी विज्ञान पदवी, उद्यान विद्या पदवीच्या अंतिम वर्षातील प्रकल्प अहवाल आणि तोंडी परीक्षेत यामध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन ..!

आपणास येथे कळविण्यात येते की, या वर्षी कोरोना : covid-19 ही परिस्थिती उद्भवल्याने सर्व कृषी विज्ञान पदवी आणि उद्यानविद्या पदवी या अंतिम वर्षातील असलेल्या सर्वच विद्यार्थ्यांचे प्रकल्प हे विद्यापीठ स्तरावर, विद्यापीठाने दिलेल्या पोर्टलमार्फतच सॉफ्ट पीडीएफ कॉपी मध्ये अपलोड करावयाचे आहे.

सदर अंतिम प्रकल्प अहवाल पीडीएफ फाईल मध्ये अपलोड करण्याबरोबरच संबंधित विद्यार्थ्याचा अंतिम प्रकल्प अहवाल तपासलेल्या तपासणी तज्ञाचा मूल्यमापन अहवाल (Project Evaluation Report) याची PDF फाईल देखील संबंधित विद्यार्थ्यांनी अपलोड करावयाची आहे.

वरील सर्व प्रक्रिया योग्य पद्धतीने व्हावी या हेतूने खालीलप्रमाणे मुद्देनिहायप सर्व संबंधितांना (केंद्रप्रमुख / केंद्रसंयोजक आणि विद्यार्थी यांचेसाठी) सदरील पत्राद्वारे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहे.आपणास विनंती की खालीलप्रमाणे संबंधितांनी सूचनांचा अवलंब करूनच वरील प्रक्रिया करावी

I] विद्यार्थ्यांना सूचना:

1) सर्वप्रथम विद्यार्थ्यांनी अंतिम प्रकल्प अहवाल आणि तपासणी तज्ञाचा मूल्यमापन अहवाल कसा अपलोड करावा याबाबतच्या मार्गदर्शक सूचना अंतर्भूत असलेले, विद्यापीठ पोर्टलवर देण्यात आलेले माहितीपूर्ण **प्रेझेंटेशन काळजीपूर्वक बघावे.**

2) सदरील लिंक मध्ये विद्यार्थ्याने त्याच्या प्रकल्पाची पीडीएफ फाईल अपलोड करावयाची आहे

3) विद्यार्थ्यांनी स्क्रीन वरील Login as a मधील student ह्या नावावर क्लिक करून, त्याखालील Login ID मध्ये स्वत:चा 16 अंकी PRN नंबर नमूद करावा. व Password मध्ये तुमच्या स्वत:चा University कडून प्राप्त Password नमूद करून Login बटनावर क्लिक करावे.



सूचना : Password हा विद्यार्थ्याची Date of Birth (YYMMDD) / जन्मवर्ष /महिना / जन्मतारीख ह्या स्वरुपात असते. जर आपली Date of Birth हि 25/03/1986 अशी आहे तर आपला Password 860325 असा असेल.

4) प्रकल्प अहवाल बरोबरच विद्यार्थ्यांनी **प्रकल्प अहवाल तपासणी तज्ञाने दिलेला अहवाल (प्रकल्प तपासणी तज्ञाचा दुरुस्त्या सूचना सुचवलेला मूल्यमापन अहवाल-Project Evaluation Report)** देखील मोबाईलने इमेज काढून त्याची PDF फाईल अपलोड करावयाची आहे

5) प्रकल्प अहवाल तपासणी तज्ञाने सुचवलेल्या **सर्व दुरुस्त्या यांचा अंतर्भाव प्रकल्पामध्ये केल्यानंतरच** अंतिम स्वरूपातील प्रकल्प अहवाल पीडीएफ फाईल अपलोड करावी.(जर अशा काही सूचना दुरुस्त्या त्यात अंतर्भूत केलेल्या नसतील तर सदरील प्रकल्प केंद्र पातळीवर तसेच विद्यापीठ पातळीवर रिजेक्ट केला जाईल याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी)

6) **प्रकल्पाची पीडीएफ फाईल सोफ्टकॉपी जास्तीत जास्त 15 MB एवढ्या size ची असावी**

7) सदरील प्रकल्प पीडीएफ फाईल मध्ये संपूर्ण प्रकल्प (सुरूवातीचे कव्हर पेज पासून शेवटच्या पानापर्यंत)अंतर्भूत केला पाहिजे

8) प्रकल्प अपलोड करते वेळी विद्यार्थ्यांनी मार्गदर्शक तज्ञ प्रमाणपत्र, **केंद्र प्रमुख /संयोजक यांचे प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्रे** दिनांक, स्वाक्षरी आणि शिक्का असल्याची खात्री करून घ्यावी

9) विद्यार्थ्यांनी संपूर्ण प्रकल्प अहवाल पीडीएफ फाईल त्याच्या स्वत:च्या लॉगिन मधून अपलोड करावी असे अपेक्षित आहे. परंतु जर काही विद्यार्थ्यांना यासंदर्भात अडचण येत असेल अशा विद्यार्थ्यांनी सीडी मध्ये सॉफ्ट कॉपी आपल्या शिक्षण केंद्राची मदत घेऊन अपलोड करावी.

10) विद्यार्थ्याने एकदा प्रकल्प अहवाल आणि मूल्यमापन अहवाल अपलोड केल्यानंतर लवकरच विद्यापीठ पोर्टल मार्फत विद्यार्थ्यांना कृषी विज्ञान विद्याशाखेचे सही शिक्का असलेले प्रमाणपत्र उपलब्ध करण्यात येईल.

11) सर्व विद्यार्थ्यास आपला अंतिम प्रकल्प अहवाल सॉफ्ट PDF कॉपी आणि मूल्यमापन अहवाल सॉफ्ट PDF कॉपी हे अपलोड करणे अत्यावश्यक आहे.

12) वरील प्रमाणे ऑनलाईन लिंक वर अपलोडिंग संदर्भात विद्यार्थ्यांना काही अडचणी येत असल्यास त्यांनी त्यांच्या संबंधित असलेल्या कृषी शिक्षण केंद्रांकडून या संदर्भातील मदत घ्यावी मात्र सदरील प्रकल्प अहवालाचे अपलोडिंग हे विद्यार्थ्यांच्या लॉगिन मधूनच करण्यात यावे.

13) वरील प्रमाणे विद्यार्थ्यांनी संपूर्ण प्रक्रिया केल्यानंतर सदरील विद्यार्थ्याचा प्रकल्प अहवाल संबंधित कृषी शिक्षण केंद्राने आणि विद्यापीठाने मंजूर केल्यानंतर संबंधित विद्यार्थ्याच्या लॉगिनमध्ये संबंधित विद्यार्थ्यास प्रकल्प अहवाल याबाबतचे प्रमाणपत्र (प्रकल्प अहवाल यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे संबंधित अधिकाऱ्यांची स्वाक्षरी आणि विद्यापीठाचे शिक्का असलेले प्रमाणपत्र) देण्यात येईल.

साधारणपणे संबंधित विद्यार्थ्यांचे प्रकल्प अहवाल केंद्राने ऑनलाईन मंजूर केल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत विद्यापीठामार्फत संबंधित विद्यार्थ्यांचे प्रकल्प अहवालाचे प्रमाणपत्र विद्यार्थ्यांच्या आणि केंद्राच्या लॉगिन आयडी मध्ये विद्यापीठामार्फत टाकले जाईल.

II | कृषी शिक्षण केंद्रास सूचना:

1) सर्व कृषी शिक्षण केंद्र प्रमुख/ संयोजक यांचेसाठी विद्यापीठ पोर्टलवर केंद्राने विद्यार्थ्यांनी अपलोड केलेले प्रकल्प संदर्भातील महत्त्वपूर्ण असलेले विविध सूचना अंतर्भूत असलेले प्रेझेन्टेशन वरील लिंकवरच अपलोड केलेले आहे कृपया ते व्यवस्थित अभ्यासावे.

2) सर्व कृषी शिक्षण केंद्र प्रमुख आणि केंद्र संयोजक यांनी त्यांचे केंद्राचे https://ycmou.digitaluniversity.ac या पोर्टल वरील लोगिन आयडी पासवर्ड वापरून त्यांच्या केंद्रावर जमा झालेले सर्व प्रकल्प टॅब असलेली यादी प्रथमता बघावी.

3) त्यानंतर आपल्या केंद्रावर वरील लिंक मार्फत जमा केलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याने त्याने त्याचा **प्रकल्प अहवाल (PDF file) आणि तपासणी तज्ञ मूल्यमापन अहवाल (Project Evaluation Report PDF file मध्ये)या दोन्ही बाबी** योग्यरीत्या अपलोड केलेल्या आहे की नाही ते व्यवस्थित बघावे.

4) विद्यार्थ्यांनी तपासणी तज्ञाने सुचविलेल्या **सर्व सूचनांचा अंतर्भाव केलेला आहे की नाही ते हे सर्व कृषी शिक्षण केंद्राने काळजीपूर्वक बघावे.** त्यानुसार सर्व सूचनांचा अंतर्भाव असलेले, सुस्पष्ट, संपूर्ण प्रकल्प अहवाल पीडीएफ फाईल योग्यरीत्या विद्यापीठ फॉरमॅटमध्ये असल्याची खात्री झाल्यानंतर झाल्यानंतरच संबंधित प्रकल्प "Approve Tab" क्लिक करून मंजूर करावा.

5) अंतिम प्रकल्प अहवाल पीडीएफ फाईल मध्ये अशाप्रकारे असावा की त्यामध्ये **कव्हर पेज पासून अंतिम पेज पर्यंत संपूर्ण प्रकल्पाचा समावेश झालेला असावा.** अपुरे, अर्धवट, अस्पष्ट, विद्यापीठाने माहिती पुस्तिकेत नमूद केलेल्या फॉरमॅटमध्ये नसलेले प्रकल्प अहवाल तसेच तपासणी तज्ञाचा अहवालातील सर्व सूचनांचा अंतर्भाव अंतिम प्रकल्पात झालेला नसल्यास असा प्रकल्प संबंधित केंद्राने "Disapprove tab" वर क्लिक करून नामंजूर करावा आणि त्याच्या शेजारी असलेल्या " Remark for Disapprove " या Tab वर क्लिक करून त्यामध्ये त्यासंबंधीचे योग्य कारण नमूद करावे.

6) ऑनलाईन लिंक वर अपलोडिंग संदर्भात विद्यार्थ्यांना काही अडचणी येत असल्यास त्यांनी त्यांच्या संबंधित असलेल्या कृषी शिक्षण केंद्रांकडून या संदर्भातील मदत घ्यावी मात्र सदरील प्रकल्प अहवालाचे अपलोडिंग हे विद्यार्थ्यांच्या लॉगिन मधूनच करण्यात यावे.

7) ज्या विद्यार्थ्यांना त्यांचा प्रकल्प अपलोड करण्यासंदर्भात अडचणी येत असेल अशा विद्यार्थ्यांना केंद्राने त्यांच्या विद्यार्थ्यांच्या लॉगिन मधून प्रकल्प अपलोड करण्यासंदर्भात मदत करावी. यासाठी कृषी शिक्षण केंद्राने https://ycmou.digitaluniversity.ac या पोर्टल वर त्यांचे केंद्राचे लॉगिन करून Student Profile मध्ये View Student Profile ला जाऊन PRN टाकून Personal Details ला विद्यार्थी Date of Birth (yymmdd) नुसार असलेला पासवर्ड संबंधित विद्यार्थ्याला कळवावा . आणि नंतर विद्यार्थ्यांचे लॉगिन मधूनच प्रकल्प अपलोड करण्यात यावा.

III | कृषि विज्ञान विद्याशाखेमार्फत करावयाची कार्यवाही

1)विद्यापीठस्तरावर कृषीविज्ञान विद्याशाखेतील संबंधितांनी विद्यार्थ्यांनी अपलोड केलेले प्रकल्प संदर्भातील महत्त्वपूर्ण असलेले विविध सूचना अंतर्भूत असलेले प्रेझेन्टेशनवरील लिंकवरच अपलोड केलेले आहे कृपया ते व्यवस्थित अभ्यासावे.

2)कृषीविज्ञान विद्याशाखेतील संबंधितांनी यांनी त्यांचे https://ycmou.digitaluniversity.ac या पोर्टलवरील लॉगिन आयडी पासवर्ड वापरून सदरील पोर्टलवर विद्यार्थ्यांमार्फत जमा झालेले आणि केंद्रामार्फत आणि फॉरवर्ड केलेले सर्व प्रकल्प टॅब असलेली यादी प्रथम बघावी.

3) वरील लिंक मार्फत सर्व विद्यार्थ्यांनी अपलोड केलेले प्रकल्प आणि केंद्राने मंजूर आणि फॉरवर्ड केलेला प्रकल्पअहवाल (PDF file) आणि तपासणी तज्ञ मूल्यमापन अहवाल (Project Evaluation Report PDF file मध्ये)या दोन्ही बाबी कृषी विज्ञान विद्याशाखेतील संबंधितांच्या लॉगिनमध्ये योग्यरीत्या अपलोड केलेल्या आहे की नाही ते व्यवस्थित बघावे.

4) विद्यार्थ्यांनी तपासणी तज्ञाने सुचविलेल्या सर्व सूचनांचा अंतर्भाव केलेला आहेकी नाही ते यासर्व बाबी कृषिविज्ञान विद्याशाखेतील संबंधितांनी काळजीपूर्वक बघावे. त्यानुसार सर्वसूचनांचा अंतर्भाव असलेले, सुस्पष्ट, संपूर्ण प्रकल्प अहवाल पीडीएफ फाईल योग्यरीत्या विद्यापीठ फॉरमॅट मध्ये असल्याची खात्री झाल्यानंतरच संबंधितप्रकल्प "Approve Tab" क्लिक करून मंजूर करावा.

5) अंतिम प्रकल्प अहवाल पीडीएफ फाईलमध्ये अशाप्रकारे असावाकी त्यामध्ये कव्हरपेजपासून अंतिम पेज पर्यंत संपूर्ण प्रकल्पाचा समावेश झालेलाअसावा. अपुरे, अर्धवट, अस्पष्ट, विद्यापीठाने माहितीपुस्तिकेत नमूद केलेल्या फॉरमॅट मध्ये नसलेले प्रकल्प अहवाल तसेच तपासणीतज्ञाचा अहवालातील सर्व सूचनांचा अंतर्भाव अंतिम प्रकल्पात झालेला नसल्यास असा प्रकल्प संबंधितकेंद्राने "Disapprove tab" वर क्लिक करून नामंजूर करावाआणि त्याच्याशेजारी असलेल्या " Remark for Disapprove " या Tab वर क्लिक करून त्यामध्ये त्यासंबंधीचे योग्यकारण नमूद करावे.

6) कृषी विज्ञान विद्याशाखेतील संबंधितांनी एखाद्या विद्यार्थ्याचा प्रकल्पमंजूर केल्यानंतर " **सदर प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केल्याबाबतचे विद्यापीठस्तरावरील प्रमाणपत्र "(सहीव शिक्का असलेली डिजिटल सॉफ्टकॉपी) संबंधित विद्यार्थ्यांच्या आणि केंद्राच्या लॉगिन आयडीला पाठवले जाईल.** या प्रमाणपत्राची सदर विद्यार्थ्यांनी रंगीत झेरॉक्स काढून प्रकल्पामध्ये संबंधित जागी लावून प्रकल्प बाइंडस्वरूपात एकाच प्रतीमध्ये करावा. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सदरील एकमेव प्रकल्प अहवाल प्रत स्वत:कडे पुढील संदर्भासाठी जतन करून ठेवावी. संबंधित कृषी शिक्षण केंद्र आणि प्रकल्प मार्गदर्शक तज्ञ यांना हार्ड बाईंड स्वरूपात प्रकल्प देण्याची आवश्यकता नाही.

IV] परीक्षा विभागाने करावयाची कार्यवाही

1)कृषी विज्ञान विद्याशाखेने मंजूर (Approved) आणि फॉरवर्ड केलेले सर्व प्रकल्प अहवाल सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी परीक्षा विभागातील संबंधितांच्या लॉगीन मध्ये डिस्प्ले होईल. त्यानंतर **परीक्षा विभागातील संबंधितांच्या लॉगिन मार्फत विद्यार्थ्यांच्या लॉगिनमध्ये सदर पदवी प्रकल्प आणि तोंडी परीक्षेचे " गुणपत्रक " टाकले जाईल.**

2) त्यानंतर विद्यापीठातील परीक्षा विभागामार्फत **अंतिम वर्षाच्या संबंधित विद्यार्थ्यांच्या गुणपत्रकाची हार्डकॉपी संबंधित विद्यार्थ्यांच्या केंद्रावर पोस्टाने / कुरियरने पाठविण्याची कार्यवाही आठ दिवसाच्या आत केली जाईल.**

वरील प्रमाणे सर्व सूचनांचा कृषी शिक्षण केंद्रप्रमुख, संयोजक विद्यार्थ्यांनी आणि विद्यापीठातील संबंधितांनी कृपया अवलंब करावा ही विनंती.

धन्यवाद...!!

Vaymandan 9/8/2021

संचालक

कृषिविज्ञान विद्याशाखा

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक



प्रत : माहिती व उचित कार्यवाहीसाठी

1) मा. कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
2) मा. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक
3) मा. संचालक, विद्यार्थी सेवा विभाग, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
4) मा. परीक्षा नियंत्रक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक
5) मा.सर्व विभागीय संचालक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
6) MKCL